# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – २२६१७९६९ , फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


संकेतस्थळ परिपत्रक

जा.क्र.१८/तशिसं / ईबीसी /२०१८/१४८
दिनांक : ०७/०४/२०१८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची** विद्यार्थ्यांना प्राप्त रक्कम त्यांनी त्यांच्या महाविद्यालयाला / तंत्रनिकेतनाला / संस्थेला शुल्का पोटी तात्काळ अदा करणे.

संदर्भ : १) शासन निर्णय : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. ०७ ऑक्टोबर, २०१७.
२) शासन निर्णय : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. १४ फेब्रुवारी, २०१८.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, या संचालनालयांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमास सन २०१७-१८ करीता **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती"** साठी अर्ज विद्यार्थ्यांकिडून भरुन घेण्यात आलेले होते. सदर अर्जांची संस्थांमार्फत व विभागीय कार्यालयांमार्फत छाननी करण्यात आली.

विभागीय कार्यालयांनी मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक प्रमाणित (Authenticate) करण्यात आलेले आहेत तसेच आधार सोबत बँक खातेही संलग्नित आहे अशा विद्यार्थ्यांपैकी उपलब्ध निधीनुसार आणि तो वितरण करण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून दि. ३१ मार्च, २०१८ रोजी सदर विद्यार्थ्यांना डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अंतर्गत आधार बेस्ड रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची यादी संकेतस्थळावर " www.dtemaharashtra.gov.in " (मुखपृष्ठ व शिष्यवृत्ती सेक्शन) उपलब्ध केलेली असून आपल्या संकेतस्थळावर सुध्दा सदर यादीबाबत लिंक देण्यात यावी.

शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर उर्वरित पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात येईल व सर्व याद्या वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक प्रमाणित (Authenticated) झालेले नाहीत त्यांनी त्यांची माहिती त्वरीत आधारनुसार अद्ययावत करावी जेणेकरुन त्यांना मंजूर रक्कम डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अंतर्गत आधार बेस्ड देण्यात येईल.

ज्या विद्यार्थ्यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे त्यांनी उपरोक्त संदर्भांकीत शासन निर्णयानुसार, शुल्कापोटी अदा करावयाची रक्कम संस्थेला तात्काळ अदा करावी असे निदेश असल्याने आपल्या अखत्यारितील सर्व संबंधित महाविद्यालये / संस्थामार्फत विद्यार्थ्यांना सूचना देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी/2018/ 1679
दिनांक :- 26 APR 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

सदरहू विषयांन्वये संदर्भांकित पत्रात नमुद केल्यांप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.